# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे  इतिवृत्तांत

दिनांक २२-०१-२०१०

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## २२/१/२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२२) इतिवृत्त

दि.२२/१/२०१० रोजी **मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ५.३० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०३. श्री. सुरे सिताराम इसराम
०४. श्री.रविकांत काशीनाथ गवळी
०५. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०६. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०७. श्री. पांडे विनायक प्रभाकर
०८. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
०९. श्रीमती मेहरून्नीसा खान
१०. श्री.दामोधर शिंदे
११. सौ. मोमीन सफिया फिरदौस

**संवाद :**

श्री.विनायक पांडे :पहाडसिंगपुरा येथील जलकुंभ गेल्या १३ डिसेंबर ते आज पर्यंत एक ते दिड मिटर पाणी येत आहे मा.आयुक्तांना या संदर्भात वैयक्तिक भेटुन निवेदने दिलेले आहे. या संदर्भात सखोल असा खुलासा प्रशासनाने करावा नाहीतर सदरची बैठक चालु देणार नाही.

श्री.सतिष कटकटे :जायकवाडीचे प्रमुख अधिकारी यांना सभागृहात बोलावण्यात यावे. जायकवाडी येथील पंपीगकडे कुणाचे लक्ष नाही.

श्रीमती खान मेहरून्निसा :अधिकारी बैठकीस हजर नाही.

श्री.सिताराम सुरे :अधिकारी बैठकीस हजर नसेल तर आजची सभा तहकुब करण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे :जायकवाडी, फारोळा येथे दररोज संपर्क साधण्यात येत आहे की, पाण्याच्या टाकीची लेवल का भरत नाही. टाकीची लेवलसाठी रात्र रात्र जागावे लागते. ज्या दिवशी पाण्याचा दिवस असतो त्या दिवशी रात्री दोन पर्यंत जागे रहावे लागते. जायकवाडी नक्षत्रवाडी येथे वारंवार संपर्क साधावा लागतो. कुणी म्हणतो एक पंप चालु आहे दोन पंप चालु आहे सातशे चौदाशेची लाईन बंद आहे. अधिकारी उपस्थित राहत नाही.

श्री.नारायण कुचे :मुकूंदवाडी, शिवाजी नगर येथे १५ वर्षापुर्वी पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे अद्यापपर्यंत त्या कॉलनीस पाणी नाही. याबाबतीत प्रशासनाने खुलासा करावा.

उप अभि.श्री.खाजा I.B. :जे नविन काम केलेले आहे त्यात स्पष्ट अटी टाकुन काम केलेले आहे. जो पर्यंत आपल्याला वाढीव पाणीपुरवठा मिळणार नाही तोपर्यंत पाणी देता येणार नाही.

श्री.नारायण कुचे :प्रशासन सभागृहाचे दिशाभुल करीत आहे १५ वर्षापुर्वी पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे. माजी महापौर सुनंदाताई कोल्हे यांचे कार्यकाळात शिवाजीनगर येथे पाईपलाईन टाकलेली आहे. सभा तहकूब करून स्थळ पहाणीकरता स.सदस्य आणि मा.सभापती यांनी चलावे.

मा.सभापती :स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

उप अभि.श्री.खाजा I.B. :ही नवीन वसाहत आहे. जुन्या वसाहतींना पाणी चालू आहे त्यांनाच पाणी देण्यात येत आहे.

श्री.विनायक पांडे :चार निवदने नागरीकांनी आणि मी स्वत: प्रशासनास दिलेली आहे गेल्या १३ डिसेंबर पासून पहाडसिंगपुरा येथील पाण्याच्या टाकीचा रेकॉर्ड मागविण्यात यावा, टाकी दोन मिटरच्यावर भरलेली नाही. नागरीकांना पाच ते दहा मिनंट पाणी मिळत आहे नगरसेवकांच्या डयुटया लागलेल्या आहेत. अधिकारी रात्री फोनही उचलत नाही. अधिकाऱ्यांमध्ये co-ordination नाही. फारोळा येथुन पंप किती चालु आहे हे कुणाला सांगता येणार नाही.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :माझ्या वार्डामध्ये दहा ते पंधरा वर्षापुर्वीची सोसायटी आहे त्यास पाणी नाही आणि बाजुला नविन सोसायटीस लगेंच पाणी देण्यात आले आहे.

उप अभि.श्री.रामटेके :विद्यापीठ गेट,मकबरा येथील टाकी आणि क्रांती चौक येथील जी टाकी आहे हि हायलेवल एमबीवर आहे. फारोळयापासुन पाच पंप संध्याकाळी सात वाजता सुरू होऊन सकाळी सात वाजेपर्यंत सुरू राहीलेतर तीन्ही टाक्यांची लेवल येते.

श्री.सतिष कटकटे :वारंवार अधिकाऱ्यांना फोन लावले जातात दोन पंपाच्या वर पंप आजपर्यंत चालु झालेले नाही. दोन मीटरच्या वर टाकी भरत नाही. एके दिवशी दोन मीटर टाकी भरली आणि चार मीटरची लेवल दाखविण्यात आली. मा.आयुक्तांच्या निर्देशनास हि बाब दाखविण्यात आली.

श्री.विनायक पांडे :रात्र रात्र टाकीवर जावुन जागावे लागते व टाकीची लेवर आल्यावर बंद करण्यास कर्मचाऱ्यांना सांगावे लागते. नागरीकांना पाच ते दहा मिनंटच पाणी मिळते यास जबाबदार कोण आहे.

श्री.सतिष कटकटे :तिसरा पंप चालू आहे म्हणुन अधिकाऱ्यांनी सांगण्यात यावे. दोन पंपाशिवाय इतर पंप बंद आहे.

मा.सभापती :लोडशेडींगमुळे ही समस्या उद्‌भवत असेल.

श्री.विनायक पांडे :अधिकाऱ्यांमध्ये Co-ordination नाही.

श्री.प्रशांत देसरडा :वार्डामध्ये पाणी आले नाही म्हणुन चौकशी करण्यासाठी अधिकाऱ्यांना फोन केला (क्रांती चौक टाकी) त्यावेळेस उत्तर मिळाले की, नक्षत्रवाडी पासून शहराला पाणी बंद आहे. नक्षत्रवाडी येथे फोन केला असता माहीती मिळाली

की, फारोळापासून नक्षत्रवाडी येथे पाणी पडत नाही. फोन करण्यापुर्वी चार तासांपासून पाणी बंद होते संबधीत अधिकारी श्री.फालक यांना फोन केला असता त्यांना माहीती नव्हती की, चार तासांपासून सप्लाय बंद आहे. शहरात उपस्थित अधिकाऱ्यांना फोन केला असता अधिकाऱ्यांना माहीतीच नव्हते की, फारोळा पासून नक्षत्रवाडी पर्यंत पाणी बंद आहे. माझ्या फोन मुळे माहीती मिळाली की, पाच तासापासुन नक्षत्रवाडी पासुन क्रांतीचौक पाण्याच्या टाकीमध्ये पाणी बंद आहे. श्री.खाजा आय.बी. यांचेशी चर्चा केली, तीन पंपापैकी दोन पंप चालु होते व एक बंद होता म्हणुन क्रांतीचौक पाण्याच्या टाकीमध्ये पाणी पडत नव्हते. दोन पंपाचे पाणी गेले कुठे हा प्रश्न पडला. श्री.खाजा आय.बी. यांनी अधिकारी/कर्मचाऱ्यांना फोनद्वारे माहीती घेण्याचा प्रयत्न केला परंतु दोन मोटारचे पाणी चालले कुठे याबाबत माहीती मिळाली नाही. त्याचा भुर्दंड शहरातील नागरीकांना भोगावा लागतो. नगरसेवक एकमेकांना विनंती करून सांगत असतात की, पाण्याच्या टाकीवरच नगरसेवकांनी घर केले पाहीजे. आज आपण पाणी घ्या उद्या माझ्या वार्डाला पाणी देण्यात यावे. एकदा माझ्या लाईनमनला कोंडुन ठेवण्यात आले होते कारण माझ्या वार्डातील सप्लायचा वेळ होता माझ्या वार्डातील पाणी घेतले होते माहीती घेतली असता लाईनमन यांनी सांगीतले की, श्री.डी.पी.कुलकर्णी साहेबांनी सांगीतले, श्री.डी.पी.कुलकर्णी यांना फोनद्वारे विचारणा केली असता त्यांनी सांगीतले मी सांगीतलेले नाही. सहा सहा तास दोन पंपाचे पाणी चालते पण पाणी पडते कुठे याची माहीती नाही. छावणी येथे पाणी किती देतो माहीत नाही. गेवराई येथील कत्तलखान्यास किती पाणी देतो याबाबतची माहीती नाही त्यास स्वतंत्र लाईन आहे. शहरातील नागरीकांना एक दिवसाआड पाणी देण्यात येते तर सर्वांनाच एक दिवसाआड पाणी दिले पाहीजे. जायकवाडी ते क्रांतीचौक सप्लाय सुधारण्यासाठी प्रशासनाने तिन्ही कार्यकारी अभियंता यांच्यात समन्वय ठेवणे गरजेचे आहे. ही सर्व योजना यासाठी सुरू आहे की, पुर्वीप्रमाणे पाणीपुरवठयासाठी स्वतंत्र अधिकारी असावे यासाठी आहे. जायकवाडी ते क्रांती चौक पर्यंत कुणातही co-ordination नाही कुठला पंप कुठे चालु आहे याबाबतची प्रशासनाकडे माहीती नाही. नगरसेवकांनी फोन केल्यानंतर प्रशासनास माहीती होते की, कुठे बिघाड आहे. हा सर्व प्रकार अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे होत आहे जेवढे पाणी शहरास देण्यात येत आहे ते योग्य प्रकारच्या सिस्टीममध्ये दिल्यास ते पुरेशे आहे तसेच पाणी सोडण्याच्या वेळेतही अनियमीतता आहे व पाण्यास प्रेशरही नाही.

श्री.विनायक पांडे :जायकवाडी ते नक्षत्रवाडी, फारोळा ते रेल्वेस्टेशन पर्यंतच्या पाण्याची सिस्टीम कोण अधिकारी बघतो याबाबत खुलसा देण्यात यावा.

श्री.शिरसाट(उप-अभि.यां.): जुनी स्किम आणि नविन स्किमद्वारे शहरास पाणीपुरवठा होतो. जायकवाडीला जुण्या स्किमद्वारे तीन पंपाद्वारे पाणी पुरवठा होतो आणि नविन जायकवाडी आहे त्या ठिकाणी पाच पंप नियमीत चालतात. फारोळा येथे जुण्यावर तीन पंप आणि नविनवर पाच पंप चालतात. जायकवाडीहुन पाणी

कमी आल्यास फारोळा येथील पाचवा पंप १२ ते १४ तास बंद असतो. १ डिसेंबर ते १९ जानेवारी पर्यंत फक्त ०३ तारखेला सप्लाय डिस्ट्रंब झालेला आहे. जानेवारी महिण्यामध्ये ०२ जानेवारी आणि १५ जानेवारी रोजी विद्युत सप्लाय नसल्यामुळे पंपीग कमी झालेले आहे इतर दिवशी नियमीत पंपीग चालु आहे.

श्री.विनायक पांडे :आमच्या विभागातील डेप्युटी इंजिनीअर यांचेकडुन खुलासा घेण्यात यावा. याच्याकडे समस्या नाहीतर मग समस्या कुठे आहे पाणी का येत नाही.

श्री.सतिष कटकटे :आमच्या भागात दररोजच पाण्याच्या समस्या आहे. दोन पंप चालु आहे तिसरा पंप बंद आहे.

उप अभि.श्री.रामटेके :१३ डिसेंबर पर्यंत टाक्यांचे लेवल व्यवस्थित झालेले आहे. पाचवा पंप सायंकाळी ७ च्या सुमारास सुरू होऊन सकाळी ७ वाजेपर्यंत सुरू राहीली तरच टाक्यांची लेवल येते.

श्री.विनायक पांडे :माझ्या विभागातील टाकीत रात्री दिड वाजता पाणी पडण्यास सुरूवात होते आणि दोन वाजता पाणी पडणे बंद होते. मी स्वतः त्या ठिकाणी हजर राहतो एक ते दिड मीटर पाणी टाकीत पडले जाते. जो पर्यंत एक अधिकारी रात्रीचा पेट्रोलींग करणार नाही तो पर्यंत ही परिस्थीती सुधारू शकणार नाही. नक्षत्रवाडी ते फारोळा पर्यंतचा सप्लाय तपासणी तसेच कुठला पंप बंद आहे व टाकयांची लेवल कुठपर्यंत आलेली आहे याबाबतची तपासणी करण्यात यावी. फारोळयापासुन जो सप्लाय होतो त्यात एक सिडकोसाठी आणि दुसरा जुण्या शहरासाठी दोन होल केलेले आहे एका होलमध्ये वाळुनी भरलेल्या गोण्यांनी होल बंद केलेले आहे. सिडकोस व शहरास आळीपाळीने पाणी पुरवठा करण्यात यावा. सिडकोची एक्सप्रेस लाईन तीन तास बंद राहिलीतर आमच्या टाक्याची लेवल व्यवस्थित येते.

श्री.सतिष कटकटे :सिडकोची लाईन बंद राहील्यास टाक्यांची लेवल येते.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शहरात जेव्हा पाणी दररोज येत होते तेव्हा पाणी कमी पडत नव्हते आता एक दिवसाआड पाणी केल्यावर पाणी कमी पडत आहे. महानगरपालिकेत सिडको ज्यावेळेस हस्तांतरण झाले तेव्हापासून एक दिवसाआड पाणी देण्यास सुरवात झाली. जुन्या शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी सिडकोची एक दिवस पाणीपुरवठा बंद करून प्रयोग करून पहावा.

श्री.प्रशांत देसरडा :दोन वर्षापासुन अर्ध्या शहराला दररोज पाणी होते आणि अर्ध्या शहरास एक दिवसाआड पाणी आहे आणि दोन वर्षात निर्णय घेतला की, संपुर्ण शहरास एक दिवसाआड पाणी करा. एक दिवस जे पाणी बचत झाले ते गेले कुठे.

मा.सभापती :पाण्याची जी बचत झालेली आहे त्यातील एका दिवसाचे पाणी कुठे गेलेले आहे खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभि.श्री.पानझडे : सिडकोला एक दिवसाआड पाणी देण्यात येते आणि पुर्वी शहरात इतर भागात दररोज पाणी देण्यात येत होते. मध्यंतरी झालेल्या निर्णयानुसार संपुर्ण शहरालाच एक दिवसाआड पाणी द्यायचे. हा निर्णय घेतांना काही लोकांना पाणी मिळत नसल्यामुळे एक दिवसाआडचा निर्णय घेण्यात आला. ज्या लोकांना पाणी मिळत नव्हते त्यांना पाणी मिळत आहे. स.सदस्यांनी जो प्रश्न

उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत तपासणी करून माहिती घेऊन खुलासा करण्यात येईल.

श्री.विनायक पांडे :सदरील काम हे फिल्डवर्कचे काम आहे. यास अहवालाची गरज नाही. तपासणी केल्यास माहीती मिळु शकेल व सप्लाय सुधारू शकेल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :प्रशासनाने सप्लाय सुधारणा करण्यासाठी ज्या टेक्निकल बाबी असतील ज्या अडचणी असतील त्या दुर करण्याचा प्रयत्न करावा.

श्री.नारायण कुचे :प्रशासनाने खुलासा केल्याप्रमाणे नविन जलवाहिनी असल्यामुळे पाणी पुरवठा होत नाही. जलवाहिनी हि १५ वर्षापुर्वी टाकण्यात आलेली आहे. मग ते नविन कामात कसा समावेश होईल. शेजारी असलेल्या पुंडलिकनगरला पाणी तात्काळ देण्यात आले. पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. सभा तहकूब करून पहाणी करण्यासाठी यावे.

मा.सभापती :केंद्र सरकारने पाईप खरेदीचा प्रस्ताव रद्द केला आहे.

श्री.नारायण कुचे :१५ वर्षापुर्वी पाईप लाईनबाबत संचिकेत जे नमुद केलेले आहे ते प्रशासनाने दाखविण्यात यावे.

उप अभि.श्री.खाजा I.B. :शिवाजी नगर येथील सप्लाय बाबत माहिती घेऊन पुढील बैठकीत माहिती सादर करण्यात येईल.

श्रीमती खान मेहरुन्निसा :सभा तहकुब करण्यात यावी. समांतर जलवाहिनीबाबत बऱ्याच वेळा चर्चा झालेली आहे. बजेट लॅप्स होणार आहे.

श्री.सतिष कटकटे :१५ वर्षापुर्वी पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे. प्रशासनाने खुलासा करावा की, त्या ठिकाणी पाईपलाईन आहे किंवा नाही.

उप अभि.श्री.खाजा I.B. :पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे.

श्री.नारायण कुचे :सदरील पाईपलाईनला पाणी केव्हा सोडणार आहे.

मा.सभापती :पाईपलाईन असतांना पाणी न येण्याचे कारण काय?

उप अभि.श्री.खाजा I.B. :पहाणी करून अहवाल सादर करण्यात येईल.

श्री.प्रशांत देसरडा :उपअभियंता आणि अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांची महिण्यातुन किती वेळेस पाणी प्रश्नाबाबत संयुक्त बैठक होती का? खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा तसेच केंद्र शासनाने पाईप खरेदीचा प्रस्ताव फेटाळला आहे असे वर्तमानपत्रातुन प्रसिध्द झाले प्रशासनाने कुठल्या नियमान्वये केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता आणि केंद्र शासनाने कुठल्या नियमान्वये प्रस्ताव फेटाळला.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :नियम सांगता येणार नाही, लिखीत असा काही नियम नाही.

मा.सभापती :वर्तमानपत्रात आलेल्या बातमीनुसार केंद्र शासनाकडे प्रशासनाने नियमानुसार प्रस्ताव सादर केलेला असेल.

कार्य. अभि.(श्री.पानझडे) :डायरेक्टर पीपीपी सेल यांचेकडे प्रोग्रेसच्या संदर्भात चर्चा होती त्यात मा.आयुक्त, मा.महापौर आणि मी स्वतः होतो.

मा.सभापती :महानगरपालिकेत दुसरे कुणी पदाधिकारी नाही का?

श्री.प्रशांत देसरडा :स्थायी समितीने जो निर्णय घेतला होता त्याचा ठराव नंबर किती आहे. ठरावाची प्रत देण्यात आलेली आहे काय?

मा.सभापती :ठरावावर सही करून देण्यात आली.

श्री.प्रशांत देसरडा :शासनाचे लेखी पत्र आलेले आहे काय?

मा.सभापती :स्थायी समितीने जो प्रस्ताव ठेवला होता त्यासंदर्भांत केंद्र शासनाने तो प्रस्ताव फेटाळला त्याबाबतीत लेखी पत्र शासनाचे आलेले आहे काय?

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :लेखी पत्र आलेले नाही.

मा.सभापती :लेखी पत्र आलेले नसतांना वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द कशी झाली.

श्रीमती खान मेहरून्निसा :लेखी पत्र आलेले नसतांना टेंडर का नाही काढण्यात आले.

मा.सभापती :मा.आयुक्तांनी लेखी स्वरूपात स्थायी समिती आणि सर्वसाधारण सभेस वेळापत्रक दिले होते त्याबाबतीत काय झाले? मा.आयुक्तांचे निर्देशाचे पालन केले जात नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :डायरेक्टर पीपीपी सेल यांचेकडे प्रोग्रेसच्या संदर्भांत जी चर्चा होती त्यात मा.आयुक्त,मा.महापौर आणि कार्यकारी अभियंता उपस्थित होते त्यात झालेली चर्चा/बातमी वर्तमानपत्रात कशी आली.

कार्यकारी अभियंता :याबाबतची माहिती मला माहित नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :प्रशासनाने तसेच मा.महापौर यांनी वर्तमानपत्रास माहिती दिली नसतांना वर्तमानपत्रात बातमी लीक कशी झाली.

मा.सभापती :तहानलेले नगरसेवक अशा मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :जनतेसमोर अशा बातम्या आल्यामुळे महानगरपालिके विषयी/ नगरसेवकांविषयी गैरसमज निर्माण होतो हे होऊ नये वर्तमानपत्रात अशा स्वरूपाच्या बातम्या लीक होऊ नये.

मा.सभापती :स्थायी समितीने प्रस्ताव मंजूर केल्यानंतर केंद्र शासनाकडे कुठल्या नियमान्वये प्रस्ताव पाठविण्यात आला.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :यामध्ये केंद्र शासनाचे सहाय्य आहे. ट्रायपार्टी ॲग्रीमेंट आहे.

मा.सभापती :कुठलाही ठराव रद्द करण्यास नियम पाहीजे. ठराव विखंडीत करण्यासाठी नियम आहेत का? विखंडीत करण्याचे अधिकार कुणाला आहे.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिकल अफेअर्सशी झालेल्या चर्चेनुसार पीपीपी सेलच्या डायरेक्टर श्रीमती भाटीया यांनी सांगीतले की, पाईपची खरेदी करता येणार नाही.

मा.सभापती :केंद्र शासनाने कुठल्या नियमान्वये प्रस्ताव फेटाळला आहे खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :स्थायी समितीने आदेशीत केले होते की, युडीची परवानगी घ्या म्हणुन त्या आशयाने त्यांना पत्र लिहिले होते.

मा.सभापती :परवानगीसाठी सांगण्यात आले होते की, प्रस्ताव रद्द करण्यासाठी सांगण्यात आले होते. स्थायी समितीने आदेशीत केले होते का? की प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात यावा. कुठल्या नियमानुसार प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. पाण्याचा प्रश्न गंभीर आहे महानगरपालिकेच्या निवडणुका जवळ आलेल्या आहेत लवकरच आचारसंहिता लागु होणार आहे.

श्री.प्रशांत देसरडा :जायकवाडी येथील तीन पंपापैकी दोन पंप चालु आहे एक बंद आहे. एक पंपाचे पाणी जाते कुठे.

श्री.सतिष कटकटे :रोज पाण्याच्या टाक्यांवरती आमची डयुटी लागलेली असते.

श्री.विनायक पांडे :याबाबतची जबाबदारी कोण घेणार आहे.

श्री.प्रशांत देसरडा :समांतरचा प्रश्न जेव्हा सुटेल तेव्हा सुटेल परंतु वार्डातील सध्याचा पाण्याचा प्रश्न तातडीने सुटला पाहिजे.

श्री.सतिष कटकटे :मा.आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

मा.सभापती :पाण्याच्या प्रश्नाबाबत कार्यकारी अभियंता (श्री.एम.डी.सोनवणे) यांनी खुलासा करावा.

कार्य.अभि.(श्री.MDसोनवणे): वार्ड अ आणि वार्ड ड मध्ये मागील एक ते दिड महिण्यांपासुन पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. औरंगाबाद शहरात तीन ठिकाणी पाणी साठविण्यात येते. हनुमान टेकडी, विद्यापीठ, एन-५ हे तीन स्पॉट शहरातील उंच भाग आहे. या तीन टाक्यांमध्ये उंचावर आहे हया तीन टाक्यांची लेवल घ्यायची असेल किंवा या लेवलला पाणी पडायचे असेल तर शहरातील इतर भाग बंद करावे लागतात. त्याशिवाय या टाक्यांमध्ये पाणी पडत नाही. हि हायड्रॉलिक सिस्टीम आहे परंतु मधे ग्रॅव्हेटी मेन रायझिंग मेन यांमध्ये टॅपिंग झालेले आहे. त्यामुळे लो लेवलला पाणी घेतले तर हाय लेवलच्या ज्या टाक्या आहेत त्यामध्ये पाणी पडत नाही त्यामुळे आज पाणीपुरवठयामध्ये समस्या निर्माण होत आहे. उदा.स.स.श्री.विनायक पांडे यांचे् वॉर्डात दोन टाक्यांपासुन पाणीपुरवठा होतो. हनुमान टेकडी, विद्यापीठ या टाक्या सर्वांत उंच लेवलला आहेत. टाक्या भरण्यासाठी ग्रॅव्हेटी मेनवर ६० ते ८० एवढे प्रेशर असेल तरच हया टाक्या भरतात. ३० ते ४० एवढया प्रेशरवर टाक्यांमध्ये एक थेंबही पाणी पडत नाही. मागील एक ते दिड महिण्यांपासुन हि परिस्थिती आहे. पाणीपुरवठा विस्कळीत होण्याचे कारण म्हणजे जे पंपीग होत आहे ग्रॅव्हीटीमधील जो डिसचार्ज मिळायला पाहिजे तो डिसचार्ज मिळत नाही बेगमपुरा भागात पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :पंप चालु असतांना दिड महिण्यांपासुन समस्या आहे प्रशासनाने सांगीतल्याप्रमाणे.

कार्य.अभि.(श्री.MDसोनवणे): लो लेवलला पाणी घेतले जात असेल.

श्री.प्रशांत देसरडा :यांच्या भागाची/वार्डाची वेळ असतांना लो लवलवर पाणी कसे घेतले जाते. यात अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नाही.

श्री.विनायक पांडे :रात्रीच्या सप्लायवर एका अधिकाऱ्याचे नियंत्रण पाहिजे.

कार्य.अभि.(श्री. सोनवणे) : औरंगाबाद शहरात एक दिवसाआड पाणी सुरू आहे. एक दिवस शहर व एक दिवस सिडको हडको त्याचप्रमाणे जायकवाडीत सिस्टीम चाललीतर कुठल्याही भागाला पाणी कमी पडणार नाही. एक वर्षापुर्वी लेखी देण्यात आले होते ती सिस्टीम अंमलात आणायची की नाही ते ठरविण्यात यावे. एक दिवसाआड पाणी शहरास सुरू आहे मग जायकवाडी एक दिवस बंद पाहिजे. रोज १४० एमएलडी पाणी उचलले जाते आणि रोज सप्लाय होतो. म्हणजेच

लो लेवलला कुठेतरी डिसचार्ज जास्त जातो कुठे कमी जात आहे. १४० एमएलडी पाणी उचलण्यात येते त्यातील अर्ध्येच पाणी उचलले गेले पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :पंधरा दिवस शहरास आणि पंधरा दिवस सिडकोस पाणी पुरवठा केल्यास अडचण येणार नाही तसा प्रयोग करून बघीतला आहे काय? चर्चा केली आहे का? आज नगरसेवकांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर प्रशासन खुलासा करीत आहे.

कार्यकारी अभियंता :मागील उन्हाळयात अशीच समस्या आली होती त्यावेळेस हा विचार केला गेला परंतु त्यात धोरणात्मक निर्णय घेऊन पध्दत सुरू केली गेली नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :मा.आयुक्तांना विनंती करण्यात येते की, सर्व कार्यकारी अभियंता यांची बैठक घेऊन यांच्यामध्ये समन्वय घडवुन हि पध्दत अंमलात आणली जावी व पाण्याचा प्रश्न सोडविण्यात यावा आज पाण्याचे नियोजन केले नाहीतर मार्च महिण्यात पाण्याची टंचाई निर्माण होईल.

श्री.प्रशांत देसरडा :जायकवाडी धरणातील आज असलेली पाण्याची स्थिती काय आहे? हया वर्षी पाऊस कमी झालेला आहे याबाबती प्रशासनाने काही कार्यवाही केलेली आहे का?

मा.सभापती :मा.आयुक्त साहेब स्वतः त्या ठिकाणी जाउन आलेत सध्या धरण कोरडे आहे. महानगरपालिकेची यंत्रणा जायकवाडी येथे उभी रहाण्यासाठी ११ कोटीचे टेंडर काढण्यात आले आहे.

श्री.नारायण कुचे :हायलेवरच्या टाक्यांमध्ये पाणी पडते त्यातील पंप नादुरूस्त झालेले आहेत का? किती पावरचे पंप आहेत.

कार्यकारी अभियंता :ग्रॅव्हीटीने पाणी जाते येथे पंपाचा प्रश्न नाही.

मा.सभापती :समांतर जलवाहिनीबाबत आणि पाण्याच्या प्रश्नाबाबत सभागृहात बऱ्याच वेळापासून चर्चा सुरू आहे मा.आयुक्त याबाबतीत खुलासा करीत आहे.

मा.आयुक्त :पाण्याच्या प्रश्नाच्या अडचणीबाबत बऱ्याच वेळापासून चर्चा सुरू आहे हि अतिशय गंभीर अशी बाब आहे. रोज १४० एमएलडी पाणी उचलत आहे मागणी हि त्याच्या निम्मे आहे. निम्मी मागणी असतांना १४० एमएलडी पाणी उचलत आहे आणि ते जनतेपर्यंत जात नसेल तर हि राष्ट्रीय आपत्ती आहे गुन्हा आहे. ज्या ठिकाणी पाणी येत नाही चढत नाही लो प्रेशर असेल किंवा ट्रॅप केलेले असेल ते शोधणे हे प्राथमिक कार्य असेल. धरणातुन पाणी उचलले जाते व एकीकडे दुष्काळ म्हणुन शेतकऱ्यांचे पाणी कमी होतेय पाणी राखीव ठेवलेले आहे असे असतांना पाणी मध्ये ट्रॅप होत असेल व प्रशासनाचे त्यावर लक्ष नसेल तर हि गंभीर स्वरूपाची बाब आहे. शहरामधील सप्लाय सुधारणे हा भाग वेगळा आहे परंतु जायकवाडी येथुन फारोळया पर्यंत फारोळयापासुन नक्षत्रवाडीपर्यंत व तेथुन तीन मुख्य टाक्यांमध्ये येणारे पाणी हे लिकेजेस आहे किंवा उचलले जात आहे असे दिसुन येते. यासाठी युध्दपातळीवरचा कार्यक्रम राबविण्यात येउ शकतो तो राबविला गेला पाहिजे त्यासाठी ज्या ज्या उपअभियंता,जे.ई,विभाग प्रमुख किंवा त्याच्या अख्यातरित्यामध्ये,कार्यक्षेत्रामध्ये या टाक्या आहेत त्या टाकीपासुन बॅकवर्ड पाठीमागे हनुमान टेकडी,विद्यापीठ,एन-५ तिथ पासुन ते थेट नक्षत्रवाडीपर्यंत

ज्या ज्या ठिकाणी राईजिंग मेनवर जिथे जिथे अनाधिकृत पाणी काढुन घेण्यात येते याचा तातडीने तीन दिवसांमध्ये सोक्षमोक्ष लावणार २३, २४, २५ तारखेला कायदेशिररित्या मॉनिटरींग करणार आणि करायचे आहे उपअभियंता, जे.ई., विभाग प्रमुख यांची ती जबाबदारी आहे. ज्या ज्या ठिकाणी बेकायदेशिररित्या नळ कनेक्शन आहेत ते तोडण्यात यावेत त्यांचेवर गुन्हे दाखल करावेत हि मुदत २७ तारखेपर्यंतची देण्यात येत आहे. ३१.०१.२०१० पर्यंत पाण्याची स्थिती सुधारली पाहिजे पाण्याचे वाटप योग्यरितीने झाले पाहिजे. मुख्य या तीन लाईनपर्यंत. जर हे झाले नाहीतर संबधीत उपअभियंता,जे.ई यांचे निलंबन होईल. अधुनमधून स.सदस्यांसोबत पहाणी करण्यात येईल. बेकायदेशिररित्या नळ कनेक्शन काढल्याची माहिती दिली आणि पहाणीत हे लक्षात आल्यास अधिकाऱ्यांना मोठी अडचण निर्माण होईल. त्यांचे दुर्लक्षामुळे जनतेच्या जिवनाशी खेळणे बरोबर होणार नाही आजरोजी पाणी मुबलक आहे. पाणी मुबलक असतांना पाणी देत नाही हि शोकांतिका आहे यास खरे कारण म्हणजे प्रशासनाचे दुर्लक्ष हेच कारण आहे.

मा.सभापती :अनाधिकृत नळ कनेक्शनबाबत मा.डॉ.भागवत कराड,महापौर असतांना मी स्वतः माहिती घेतली असता २२ हजार अनाधिकृत नळ कनेक्शन शहरात आहेत. सर्व माहिती सर्वसाधारण सभेस देण्यात आली होती त्यावर अधिकाऱ्यांनी कार्यवाही केलेली नाही. औरंगाबाद शहराच्या हद्दीमध्ये फक्त ११००/- व्यवसायीक नळ कनेक्शन आहे वास्तविक पहाता ते २२ हजार नळ कनेक्शन आहे. जर हे कनेक्शन तोडले किंवा पैशाची वसुली केलीतर रेसिडेन्शीअल नळ कनेक्शनची रक्कम वसुल करण्याचीही गरज नाही परंतु ज्याज्या वेळेसचे जे मा.आयुक्त होते त्यांनी बाब पेट्रोलपंप ते विमानतळपर्यंत जेजे अनाधिकृत व्यवसायिक नळ कनेक्शन आहेत ते तोडण्याचे निर्देश दिले होते परंतु एकही नळकनेक्शन तोडण्यात आले नाही.

श्री.रविकांत गवळी :हडको कॉर्नर ते हर्सुल टि पॉईंट पर्यंत ७० अनधिकृत नळ जोडणी आहे. प्रशासनाने अनाधिकृत नळ कनेक्शन काढण्यासाठी आले असता नागरीक त्यांचेवर धावुन गेले त्यांना मारहाणीचा प्रयत्न केला गेला. त्यांचेकडे संरक्षणासाठी स्टॉफ नसल्याकारणाने मोहिम अर्धवट सोडुन यावे लागले. हा प्रकार पुन्हा घडु नये म्हणुन प्रशासनाने दक्षता घ्यावी.

मा.आयुक्त :अतिक्रमणाचा जो स्टाफ आहे तो घेण्यात यावा. सिपींना ताबडतोब पत्र देण्यात यावे मी प्रत्यक्ष त्यांचेशी संवाद साधेल. पुरेसा बंदोबस्त घेऊन तीन दिवसात मोहिम राबवायची.

मा.सभापती :समांतर जलवाहिनीबाबत मागील दोन वर्षापासुन जलवाहिनीसाठी प्रयत्न होत आहे. मा.आयुक्तांनी लिखीत स्वरुपात स्थायी समिती आणि सर्वसाधारण सभेस वेळापत्रक देऊन निर्देश दिले होते. २६ जानेवारीपर्यंत समांतर जलवाहिनीच्या कामाचे शुभारंभ करणार आहे म्हणुन परंतु ते काम झालेले नाही आणि होणार नाही. स्थायी समितीत समांतरबाबत यानंतर चर्चा करणार नाही परंतु असे निर्देशनास आले आहे की प्रत्येक वेळेस स्थायी

समितीच्या बातम्या आणि शासनस्तरावच्या ज्या बातम्या असतील अधिकारी हे वर्तमानपत्रात उलटसुलट बातमी देण्यात येते आणि पत्रकार त्यांचे मनाप्रमाणे इच्छेप्रमाणे बातमी छापुन आणतात. प्रशासनास प्रश्न विचारण्यात आला की, कोणत्या नियमानुसार केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला आणि केंद्र शासनाने कुठल्या नियमानुसार प्रस्ताव फेटाळला याबाबतीत सविस्तर खुलासा केला नाही. समांतर जलवाहिनीबाबत सुरवाती पासून ते आजपर्यंत जी कार्यवाही करण्यात आली. कृती करण्यांत आली,काम करण्यात आले विविध स्तरावर ज्या एजन्सी नेमण्यांत आल्या व या संदर्भांत आत्तापर्यंत जे काम करण्यात आले त्याची संपुर्ण तपासणी करून व चौकशी करून सात दिवसात स्थायी समितीकडे अहवाल सादर करण्यात यावा. चौकशी अधिकारी म्हणुन मुख्य लेखापरिक्षक, तांत्रिक सहाय्य करण्यासाठी अतिरिक्त शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे यांची नियुक्ती करण्यात येते.

आजची स्थायी समिती सभा तहकुब करण्यात येते.

राष्ट्रगीतानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा - (का.प.क्र.-२२)

## सुचना

**(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३(१) व त्यास अनुसरून अनुसूची-ड, प्रकरण २ चे नियम क्र. ३ आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६६(१) अन्वये.)**

**दिनांक :- १५/०१/२०१०**

**सु च ना**

**दिनांक १५ जानेवारी २०१० शुक्रवार रोजी दुपारी ४.०० वाजता** आयोजित करण्यात आलेली स्थायी समितीची सभा काही अपरिहार्य कारणामुळे पुढे ढकलण्यात येत आहे. सभेची पुढील तारीख स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घेऊन सहकार्य करावे ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा - (का.प.क्र.-२२)**

## सु च ना

**दिनांक :- १९/०१/२०१०**

दिनांक १५/०१/२०१० रोजी पुढे ढकलण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **शुक्रवार, दिनांक २२ जानेवारी २०१० रोजी दुपारी ३.३० वाजता** आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २२) यापुर्वीच वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घेवुन सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा - (का.प.क्र.-२२)

## सु च ना

**दिनांक :- २५/०१/२०१०**

दिनांक २२/०१/२०१० रोजी तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **शुक्रवार, दिनांक २९ जानेवारी २०१० रोजी दुपारी ३.०० वाजता** "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

या सभेची विषय-पत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २२) यापुर्वीच वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घेवुन सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

टिप :- ही सभा **दुपारी ४.००** नंतरही चालू राहिल्यास
ही सभा संपल्यानंतर नियमित स्थायी समिती
सभा (का.प.क्रमांक २३) सुरू होईल.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद